# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

## नियामक मंडळाची ३० वी बैठक दि. २७.११.२००२

मा. ना. अजित पवार, मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळ) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ३० वी बैठक दि. २७.११.२००२ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. ३०/१

"ठराव करण्यात येतो की, २९ व्या बैठकीमध्ये पारित केलेले सर्व ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र. ३०/२

" ठराव करण्यात येतो की, महामंडळ स्थापनेचा अध्यादेश क्र.३/१९९६ च्या अनुषंगाने राज्य शासनाने आदेश क्र. मकृखोविम११९५/२१२/९५ जसंनि दि.१६.०२.९६ नुसार व त्यानंतरही वेळोवेळी शासनाने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे वर्ग केलेली पाटबंधारे विभागाची सर्व आस्थापना (सर्व संवर्गासह) अधिनियम क्र. १५/४.४.९६ च्या कलम १७(२) मधील तरतूद विचारात घेता, राज्य शासनाकडे प्रत्यावर्तित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३०/३

१. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली जून व जुलै २००२ मध्ये विकास कामांचा आढावा घेण्यासाठी कृष्णा खोऱ्यातील लोकप्रतिनिधींसमवेत मुंबई येथे आढावा बैठका घेण्यात आल्या. या

| | |
|---|---|
| मा. मंत्री (पा) व अध्यक्ष<br>म.कृ.खो.वि.म., पुणे | कार्यकारी संचालक<br>म.कृ.खो.वि.म. पुणे |

Resolution_dir_meet_30

बैठकीत उपस्थित झालेल्या मागण्या व त्याबाबत करावयाची कार्यवाही याबाबत शासनाने पत्र क्र. मुमंबै/२००२/ (११०/२००२)/निवसं-३ दि.१७.८.२००२ अन्वये मार्गदर्शक सूचना प्रसृत केल्या आहेत. त्या अनुषंगाने ठराव करण्यात येतो की, विषयांकित बैठकांमध्ये निर्देश दिलेली लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली कामे महामंडळाने प्राधान्याने हाती घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. संबंधित लोकप्रतिनिधींना या ठरावाच्या अनुषंगाने त्यांच्या मागण्यांवरील कार्यवाहीबाबत मा. अध्यक्ष स्तरावर अवगत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३०/४

'' ठराव करण्यात येतो की, कुकडी प्रकल्पातील वडज डावा कालवा साखळी क्र.०-३६० पासून निघणाऱ्या वडज उजव्या कालव्याचे काम (लांबी सुमारे ७.३ किमी असून एकूण लाभक्षेत्र ५४५ हेक्टर) सदर कालव्याच्या नियोजनामुळे होणारा पाणी वापर कुकडी प्रकल्पाच्या एकूण पाणीवापराच्या हिशोबात बसेल या अटींवर हाती घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution_dir_meet_30